माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**
**अपील क्रमांक : २३८८/२०२३**

**अपिलार्थी,ॲड. बंडु संपतराव साने,**
**मु.पो. गौरखेडा (कुंभी), ता असलपूर, जि. अमरावती ४४४८०६**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,**
**प्राथमिक आरोग्य केंद्र, हतरु, ता. चिखलदरा,**
**जि. अमरावती**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,**
**प्राथमिक आरोग्य केंद्र, हतरु, ता. चिखलदरा,**
**जि. अमरावती**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २२.०७.२०२३ | -- | २०.०९.२०२३ | -- |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २२.०७.२०२३** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " बालमृत्यु, उपजत मृत्यु व माता मृत्युची एकूण नावे, गावे रुग्णालये व इतर " मागितलेली आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी व्यथित होवून **दिनांक २०.०९.२०२३ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आदेश पारीत केले असल्याचे दिसून येत नाही.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १०.११.२०२३ रोजी** " माहिती मिळाली नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदर प्रकरणातील माहिती व्यापक जनहिताची असल्यामुळे अपिलार्थी यांचा व्दितीय अपिल अर्ज मंजूर करण्यात येत आहे. अपिलार्थी यांच्या दि. २२.०७.२०२३ रोजीच्या अर्जातील माहिती व्यापक जनहिताची असल्यामुळे तात्काळ प्रदान करावी. तसेच कळविण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालया मधील मुळ याचिका (सिव्हील) क्र. ९९०/२०२१, दिनांक १७, ऑगस्ट २०२३ चे आदेश तसेच सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. रामाआ २०१९/प्र.क्र.१८/सहा, दिनांक १६.०२.२०२३ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ च्या अंमलबजावणीत सूचित करण्यात आले आहे त्यानुसार प्रत्येक

शासकीय व निमशासकीय कार्यालयातील स्वयंम प्रेरणेने घोषित करावयाची माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ अनुसार १७ मुदयांची माहिती वेळोवेळी (दरवर्षी १ जानेवारी व १ जुलै) अद्ययावत करण्यात यावी तसेच कलम ४ व्यतीरीक्त आपल्या कार्यालयातील स्वयंप्रेरणेने प्रदर्शीत करणे आवश्यक असलेली सर्व माहिती आपल्या अधिकृत संगणक संकेतस्थळावर वेळोवेळी प्रदर्शित करण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य माहिती आयोगास सादर करण्यात यावा.

**आदेश**

**माहिती व्यापक जनहिताची असल्यामुळे तात्काळ प्रदान करावी अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती विभाग

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : ०८.०२.२०२४**

जावक क्रमांक 9349 दिनांक 22 FEB 2024